दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार , दि. १८ मार्च, २०२६ | वर्ष - १ | अंक - १७२ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

बुधवार, दि. दि१८ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, फाल्गुन मास, कृष्णपक्ष, चतुर्दशी सकाळी ८-२६ पर्यंत
दिवस नक्षत्र–पूर्वाभाद्रपदा रात्री (पहाटे पर्यंत) ५-२१ पर्यंत,
चंद्र रास- कुंभ, सूर्य रास = मीन, गुरु रास= मिथुन

### प्रकल्प वेळेतच पूर्ण करा

**पुणे**: सरकारी प्रकल्पांच्या कामात होणारा विलंब आणि त्यामुळे वाढणारा अवाढव्य खर्च याला चाप लावण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोणताही मोठा प्रकल्प आता अडीच ते तीन वर्षांच्या मर्यादेतच पूर्ण करावा, असे बंधन घातले आहे. या निर्णयामुळे पुणे जिल्ह्यासह राज्यातील महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना आता गती मिळणार आहे. प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे बंधन संबंधित विभागांवर असेल.

## सारांश वृत्त

### देशभरात एलपीजीचा तुटवडा कायम

**नवी दिल्ली** : एलपीजी पुरवठ्याच्या तुटवड्यामुळे हॉटेल्स, व्यवसाय आणि घरगुती ग्राहकांना जास्त प्रतीक्षा कालावधी आणि घाबरून केलेल्या बुकिंगचा फटका बसत असल्याने, केंद्र सरकारने राज्यांना पाईप गॅस प्रकल्पांच्या मंजुरीला गती देण्यास सांगितले आहे, जेणेकरून या प्रकल्पांची जलद अंमलबजावणी करता येईल आणि स्वयंपाकाच्या गॅसच्या उपलब्धतेवरील ताण कमी होईल.

### त्या ८ लोकसभा खासदारांचे निलंबन रद्द

**नवी दिल्ली** : लोकसभेने मंगळवारी, 'अव्यवस्थित' वर्तनामुळे ३ फेब्रुवारी रोजी सभागृहात प्रवेशबंदी करण्यात आलेल्या आठ विरोधी सदस्यांचे निलंबन तात्काळ प्रभावाने रद्द केले. यावेळी अध्यक्ष ओम बिरला यांनी सभागृहात किंवा संसद परिसरात फलक, पोस्टर्स, फोटो किंवा एआय-निर्मित प्रतिमा प्रदर्शित करू नयेत, यावर जोर दिला. सभागृहात जे काही घडले ते खेदजनक असून सभागृहाचे कामकाज सुरळीत चालण्यास आपला पक्ष सहकार्य करण्यास तयार आहे, असे सांगून काँग्रेस सदस्य के. सुरेश यांनी आठ विरोधी सदस्यांची नियुक्ती रद्द करण्यावर विचार करण्याची सभागृहाला विनंती केली. किरेन रिजिजू म्हणाले की सभागृहाचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी 'लक्ष्मणरेषा' आखण्याची गरज आहे.

### वाघिणीचा विजेचा धक्का लागून मृत्यू

**चामराजनगर (कर्नाटक)** : या जिल्ह्यातील एका गावातील शेतजमिनीवर विजेचा धक्का लागून एका वाघिणीचा मृत्यू झाल्याचा आरोप आहे, अशी माहिती मंगळवारी अधिकाऱ्यांनी दिली. ही घटना बांदीपूर व्याघ्र प्रकल्पाजवळील गुंडलुपेटे तालुक्यातल्या पाडागुरू गावात घडली, असे त्यांनी सांगितले. ती वाघीण सुमारे दीड वर्षांची होती, असे त्यांनी पुढे सांगितले.

### ‘नंदा देवी’ एलपीजी टँकर गुजरातमध्ये दाखल; 46 हजार मेट्रिक टन गॅससह आगमन

# हार्मुझ तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताला दिलासा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अहमदाबाद** : इराण-अमेरिका तणावामुळे हार्मुझ सामुद्रधुनीत निर्माण झालेल्या अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर भारतासाठी दिलासादायक घडामोड समोर आली आहे. भारताचा ‘नंदा देवी’ हा एलपीजी टँकर मंगळवारी सुरक्षितपणे गुजरातमध्ये दाखल झाला असून त्यामध्ये सुमारे 46 हजार मेट्रिक टन गॅस आहे.

यापूर्वी ‘शिवालिक’ हा एलपीजी टँकरही सुरक्षितपणे गुजरातमध्ये पोहोचला होता. गेल्या काही दिवसांपासून हार्मुझ सामुद्रधुनीत वाढलेल्या तणावामुळे भारतासह अनेक देशांचे तेल आणि गॅस वाहून नेणारे टँकर अडकून पडले होते. इराणकडून सुरक्षित मार्गाची हमी मिळाल्यानंतर आता हे टँकर




टप्प्याटप्प्याने बाहेर पडू लागले आहेत.

‘नंदा देवी’ या व्हेसलच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, भारताचे बंदर, जहाज व जलमार्ग मंत्रालय आणि शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. यासोबतच भारतीय नौदल आणि इराणच्या नौदलाने हार्मुझ सामुद्रधुनीतून सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ती मदत केली. दरम्यान, तणावामुळे हार्मुझ सामुद्रधुनीतील वाहतुकीवर मोठा परिणाम झाला होता. जगातील सुमारे 40 ते 50 टक्के तेल वाहतूक या मार्गावर अवलंबून असल्याने जागतिक बाजारपेठेतही अस्थिरता निर्माण झाली होती. इराणकडून काही तेलवाहू जहाजांवर हल्ल्यांच्या घटनांमुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली होती.

विशेष म्हणजे ‘नंदा देवी’ हा टँकर कंडला बंदरावर थेट न थांबवता वाडीनार किनाऱ्याजवळ समुद्रातच थांबवण्यात आला आहे. येथे या टँकरमधील एलपीजी ‘एमटी बीडब्ल्यु ब्रीझ’ आणि ‘जग प्रताप’ या जहाजांमध्ये ट्रान्सफर करण्यात येणार आहे. त्यानंतर ही जहाजे तातडीने तमिळनाडूकडे रवाना केली जाणार आहेत. वाहतूक वेळ वाचवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, ‘नंदा देवी’सारखेच आणखी 22 भारतीय टँकर अद्याप पर्शियन आखातात अडकले असल्याची माहिती आहे. स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून या जहाजांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

याशिवाय, युएईमधून ‘जग लाडकी’ हे जहाज सुमारे 81 हजार टन मुर्बन क्रूड ऑईल घेऊन भारताच्या दिशेने सुरक्षित प्रवास करत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या घडामोडींमुळे देशातील इंधन पुरवठ्याबाबतचा तणाव काहीसा कमी झाला असून आगामी काळात परिस्थिती सुरळीत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

#### ‘शिवालिक’नंतर दुसरा दिलासादायक टँकर

- आधीच एक एलपीजी टँकर सुरक्षित पोहोचला
- हार्मुझ सामुद्रधुनीत तणावाचे सावट
- इराण-अमेरिका संघर्षामुळे वाहतुकीवर परिणाम
- जगातील 40-50% तेल वाहतूक प्रभावित
- भारत-इराण समन्वयाने मार्ग मोकळा
- भारतीय व इराणी नौदलाची महत्त्वाची भूमिका
- सुरक्षित प्रवासासाठी हमी

## राज्यातील कालबाह्य ८० कायदे रद्द; विधेयक मंजूर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : महाराष्ट्रातील कालबाह्य ठरलेले ८० कायदे आणि अधिनियम रद्द करण्यासंदर्भातील विधेयक मंगळवारी विधानसभेत मंजूर करण्यात आले. सुशासन आणि सुलभ प्रशासकीय कामकाजासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून हे विधेयक विधानसभेत मांडण्यात आले. चर्चेनंतर ते मंजूर करण्यात आले. संवैधानिक बदल, राज्याची पुनर्रचना आणि नव्या कायद्यांची अंमलबजावणी यामुळे अनेक जुन्या अधिनियमांचे महत्त्व संपले आहे. या कायद्यांचे संदर्भ अद्याप कायम राहिल्याने प्रशासनात संदिग्धता निर्माण होत होती.

राज्यातील अस्तित्वात असलेल्या सर्व कायद्यांचे परीक्षण करण्यात आले असून, वापरात नसलेले आणि कालबाह्य ठरलेले अधिनियम रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये मुंबई अधिनियम, मुंबई विनियम, बंगाल विनियम, मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम, हैदराबाद अधिनियम आणि मध्य प्रदेश अधिनियम यांचा समावेश आहे. रद्द करण्यात आलेल्या कायद्यांमध्ये मुंबई अधिनियम २४, मध्य प्रांत वऱ्हाड अधिनियम ८, हैदराबाद अधिनियम १८, मध्य प्रदेश अधिनियम ३ तसेच विनियोग अधिनियम २४ यांसह एकूण ८० अधिनियमांचा समावेश आहे. याशिवाय, बंगाल जलोढ व गाळ विनियमन १८२५, ऋण व्याज गहाण अभिस्वीकृती विनियमन १८२७, भडोच व खेडा भागातील भूसंपत्ती अधिनियम १८७७, मुंबई अबकारी अधिनियम १८७८, बोस्टल शाळा अधिनियम १९२९, महाराष्ट्र अफूविषयक अधिनियम आदींचा यात समावेश आहे.

## विधानसभेत ‘धर्मस्वातंत्र्य विधेयक 2026’ मंजूर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : महाराष्ट्र विधानसभेत ‘धर्मस्वातंत्र्य विधेयक 2026’ आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले असून बळजबरी, फसवणूक, आमिष किंवा विवाहाच्या माध्यमातून होणाऱ्या धार्मिक धर्मांतरांना प्रतिबंध करण्यासाठी या विधेयकात कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे राज्यातील धर्मांतरासंदर्भातील प्रक्रियेला अधिक पारदर्शकता आणि नियंत्रण मिळणार असल्याचे सरकारकडून सांगण्यात आले. गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सभागृहात विधेयक मांडताना स्पष्ट केले की, या कायद्याचा मुख्य उद्देश घटनात्मक अधिकारांचे रक्षण करतानाच फसवणूक किंवा दबावाखाली होणाऱ्या धर्मांतरांना आळा घालणे हा आहे. “धर्मांतर हे व्यक्तीच्या स्वेच्छेने आणि पारदर्शक पद्धतीनेच व्हावे, यासाठी या विधेयकाची आखणी करण्यात आली आहे,” असे त्यांनी नमूद केले.

या विधेयकातील महत्त्वाची तरतूद म्हणजे, दुसऱ्या धर्मात धर्मांतर करू इच्छिणाऱ्या व्यक्तीने संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्यांना किमान 60 दिवस आधी पूर्वसूचना देणे बंधनकारक असेल. या तरतुदीवर काही सदस्यांनी आक्षेप घेत, ती वैयक्तिक स्वातंत्र्यावर बंधन आणणारी असल्याचे मत व्यक्त केले. मात्र, सरकारने स्पष्ट केले की ही अट केवळ धर्मांतर स्वेच्छेने होत आहे की नाही, याची खातरजमा करण्यासाठी असून, व्यक्तीच्या अधिकारांवर गदा आणण्याचा त्यामागील हेतू नाही. तसेच धर्मांतरानंतर 21 दिवसांच्या आत संबंधित अधिकाऱ्यांना माहिती देणेही आवश्यक असेल. ही प्रक्रिया प्रशासनाकडे अचूक नोंदी राहाव्यात आणि भविष्यात उद्भवणारे कायदेशीर उपयुक्त ठरणार असल्याचे भोयर यांनी सांगितले.

### मृतांना ‘जिवंत’ दाखवून अनुदान लाटले; आ. सुरेश धस यांची विधानसभेत लक्षवेधी

# बीड कामगार विभागातील कोट्यवधींचा घोटाळा उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : बीड जिल्ह्यातील बांधकाम कामगार विभागातील धक्कादायक भ्रष्टाचाराचा पर्दाफाश विधानसभेत झाला असून मृत व्यक्तींना जिवंत दाखवून आणि पुन्हा मृत घोषित करून त्यांच्या नावावर लाखो रुपयांचे अनुदान लाटल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. भाजप आमदार सुरेश धस यांनी लक्षवेधीद्वारे हा मुद्दा उपस्थित करत कोट्यवधींच्या घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी केली.

धस यांनी दिलेल्या माहितीनुसार, दहा वर्षांपूर्वी मृत झालेल्या व्यक्तीला नंतर जिवंत दाखवून त्याने 100 दिवस काम केल्याची कागदोपत्री नोंद करण्यात आली. त्यानंतर पुन्हा त्यालाच मृत




दाखवून संबंधित कुटुंबियांना सुमारे 2 लाख 30 हजार रुपयांचे अनुदान देण्यात आले. हा प्रकार एकटाच नसून बीड जिल्ह्यात अशा 100 ते 200 संशयास्पद प्रकरणांची नोंद असल्याचा दावा त्यांनी केला.

विशेष म्हणजे काही प्रकरणांमध्ये संबंधित कामगारांनी परदेशातील ‘बुर्ज खलिफा’ आणि ‘व्हाईट हाऊस’ येथे काम केल्याच्या नोंदीही स्थानिक प्रशासनाच्या कागदपत्रांत आढळून आल्या आहेत. या सर्व प्रकारातून बनावट कागदपत्रे तयार करून अधिकाऱ्यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

2020 ते 2026 या कालावधीत दाखल अर्जांमध्ये मृत व्यक्तींना जिवंत दाखवून काम केल्याचे दाखवले गेले, तसेच त्यानंतर पुन्हा मृत्यू दाखवून वारसांना अनुदान देण्यात आले. अंबाजोगाई नगर परिषदेसारख्या संस्थांमध्ये 2013 मध्ये मृत झालेल्या व्यक्तीला 2023 मध्ये कामगार म्हणून दाखवण्याचा प्रकार उघड झाला आहे. याच प्रकरणात संबंधित व्यक्तीच्या नावावर स्वयंघोषणापत्र देऊन ऑनलाईन नोंदणीही करण्यात आली होती. या गंभीर प्रकाराच्या पार्श्वभूमीवर धस यांनी सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांकडून स्वतंत्र चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत आणि घोटाळ्यातील रक्कम वसूल करावी, अशी मागणी केली. दरम्यान, संबंधित खात्याचे मंत्री आकाश फुंडकर यांनी सभागृहात उत्तर देताना ऑफलाईन नोंदणीच्या काळात काही अनियमितता झाल्याचे मान्य केले. मात्र, सध्या ऑनलाईन प्रणाली आणि बायोमेट्रिक नोंदीमुळे अशा प्रकारांना आळा बसल्याचा दावा त्यांनी केला. धस यांनी सादर केलेल्या काही प्रकरणांची तपासणी सुरू असून 53 प्रकरणांत अनियमितता आढळली नसल्याचेही त्यांनी सांगितले.

या घोटाळ्यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

### ३०१ कोटींची तरतूद; शिक्षण विभागाला विशेष प्रोत्साहन

# पुणे जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : जिल्हा परिषदेचा २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प जाहीर करण्यात आला असून यंदा ३०१ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी तो मांडला.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त शिक्षण विभागाला विशेष प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पातून करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. यासोबतच शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रावर विशेष भर देण्यात आला आहे.

पुणे जिल्ह्यात दोन सायन्स पार्क उभारण्याची घोषणा करण्यात आली असून विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यासाठी ‘कौशल्य सेतू’ उपक्रम राबविण्यात येणार आहे. पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आत्मसात करता यावी, यासाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील तंत्रज्ञानासाठी तयार करण्यावर भर देण्यात आला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सूचनेनुसार सायन्स पार्कसह स्किल सेंटर उभारण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. तसेच दिव्यांग स्वावलंबन योजना, एकल महिलांसाठी ‘माझे अस्तित्व’ योजना, जिल्हा परिषद फेलोशिप योजना राबविण्यात येणार आहे. सौरऊर्जेच्या वापराला चालना देण्यासाठी सोलर पार्क उभारून गावपातळीवर वीजनिर्मिती करण्याचा मानसही व्यक्त करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांसाठी इस्रो, नासा आणि युरोपियन स्पेस सेंटर येथे शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्हा परिषद शाळांमधील सहावी व सातवीतील विद्यार्थ्यांना या सहलींमध्ये सहभागी करून घेण्यात येणार असून इस्रोसाठी ५०, नासासाठी २५ आणि युरोपियन स्पेस सेंटरसाठी २५ विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे.

जिल्हा परिषद शाळांचे सीबीएसई संलग्नीकरण करण्याचा प्रस्ताव असून प्रत्येक तालुक्यातील एक शाळा सीबीएसई पद्धतीशी जोडली जाणार आहे. तसेच ‘ग्लोबल गुरुजी’ योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ५० उत्कृष्ट शिक्षकांना फिनलंड आणि सिंगापूरसारख्या देशांतील शिक्षण पद्धतीचा अनुभव देण्यासाठी अभ्यासदौरे आयोजित करण्यात येणार आहेत.

### टीएमसीची २९१ उमेदवारांची यादी

**कोलकाता** : निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालसह पाच राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील विधानसभा निवडणुकांची घोषणा केल्यानंतर तृणमूल काँग्रेसने उमेदवारांच्या घोषणेत आघाडी घेतली आहे. मुख्यमंत्री आणि पक्षाच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत पक्षाच्या २९१ उमेदवारांची यादी एकाचवेळी जाहीर केली. पश्चिम बंगालमधील एकूण २९४ विधानसभा जागांपैकी तृणमूल काँग्रेस २९१ जागांवर निवडणूक लढवणार असून उर्वरित ३ जागा सहयोगी पक्ष भारतीय गोरखा प्रजातांत्रिक मोर्चा यांना देण्यात आल्या आहेत.

## बारामती बिनविरोधला हाकेंचा विरोध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीची घोषणा करण्यात आली असून, दोन्ही ठिकाणच्या आमदारांच्या अकाली निधनामुळे ही निवडणूक होत आहे. २३ एप्रिल रोजी मतदान होणार असून, त्याआधीच राजकीय वातावरण तापू लागले आहे.

बारामती मतदारसंघात ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी पवार कुटुंबीयांवर थेट टीका करत निवडणूक बिनविरोध करण्याच्या चर्चेला विरोध दर्शवला आहे.

सुनेत्रा पवार यांना विधान परिषदेवर पाठवावे, तसेच बारामतीत पवार कुटुंबीयांव्यतिरिक्त उमेदवार उभा करावा, अशी भूमिका त्यांनी मांडली.

हाके म्हणाले की, “आम्ही ही निवडणूक लढवणार आहोत आणि जिंकून दाखवणार आहोत. काहींना आमच्या लढतीचा त्रास होत आहे.” त्यांनी सुनेत्रा पवार यांना बिनविरोध विधानपरिषदेवर पाठवण्याचा पर्याय सुचवत, विधानसभा निवडणुकीत वेगळा उमेदवार देण्याची मागणी केली. राज्य शासनाच्या विविध धोरणांविरोधात ही निवडणूक लढवणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यापूर्वी शरद पवार यांना राज्यसभेवर बिनविरोध पाठवण्यात आले होते, त्याच धर्तीवर सुनेत्रा पवार यांनाही विधानपरिषदेवर संधी द्यावी, असे हाके यांनी नमूद केले. तसेच, आपणच उमेदवार असणार असा आग्रह नसून स्थानिक पातळीवरील कोणताही उमेदवार निवडणूक लढवू शकतो, असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, बारामतीची निवडणूक बिनविरोध होण्याची चर्चा रंगात असतानाच हाके यांनी निवडणूक लढवण्याची तयारी दर्शवल्याने समीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर तिसऱ्याच दिवशी शपथविधी झाल्याचा उल्लेख करत, “आम्हीच दुःख व्यक्त का करायचे?” असा सवालही हाके यांनी उपस्थित केला.

### २० मार्चपर्यंत मेघगर्जना, गारपीटीचा इशारा

# राज्यात २० तारखेपर्यंत अवकाळी पावसाचे सावट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात वाढ होत असतानाच आता पुन्हा एकदा अवकाळी पावसाचे सावट निर्माण झाले आहे. विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये दुपारनंतर ढगाळ वातावरण तयार होऊन मेघगर्जनेसह वादळी पाऊस आणि काही ठिकाणी गारपीट होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील दक्षिणेकडील जिल्ह्यांमध्ये पावसाचा प्रभाव जाणवणार असून, तेलंगणा व कर्नाटक सीमेलगतच्या भागांमध्ये वादळी



वाऱ्यासह पावसाची तीव्रता अधिक राहण्याचा अंदाज आहे. हवामान तज्ज्ञांच्या माहितीनुसार, १८ मार्चपासून पावसाचे क्षेत्र आणि तीव्रता वाढणार आहे. १८ ते २० मार्चदरम्यान विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात ठिकठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि पावसाची शक्यता आहे. काही संवेदनशील जिल्ह्यांमध्ये या कालावधीत गारपीट होण्याचा इशाराही देण्यात आला आहे. २१ मार्चपासून हवामान पुन्हा पूर्वपदावर येण्याचे संकेत आहेत. दरम्यान, रब्बी हंगामातील पिकांची काढणी अंतिम टप्प्यात असताना अवकाळी पावसामुळे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. यामुळे कृषी विभागाने शेतकऱ्यांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा ताडपत्रीने झाकावीत, बाजारात आणलेला कृषीमाल ओला होणार नाही याची काळजी घ्यावी, तसेच प्लास्टिक आच्छादनांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटादरम्यान नागरिकांनीही दक्षता बाळगावी, असे प्रशासनाने सांगितले आहे. विजांच्या कडकडाटावेळी झाडाखाली किंवा टिनशेडखाली थांबू नये, वीज खांब, ट्रान्सफॉर्मर आणि उच्चदाब वाहिन्यांपासून दूर राहावे, तसेच मोकळ्या जागेत असल्यास तातडीने सुरक्षित इमारतीचा आश्रय घ्यावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. हवामानातील या बदलांमुळे पुढील चार दिवस राज्यासाठी महत्त्वाचे ठरणार असून आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांना सतर्क राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## सहायक पोलीस निरीक्षक लाच घेताना रंगेहात अटकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यात गेल्या काही महिन्यांपासून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून (एसीबी) कारवाईचा धडाका सुरू असून महसूल, प्रशासन आणि पोलीस विभागात सातत्याने धाडी टाकल्या जात आहेत. अनेक अधिकाऱ्यांना लाच स्वीकारताना रंगेहात अटक करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी मुंबईत एका पोलीस अधिकाऱ्याला अटक करण्यात आल्यानंतर आता पुन्हा एकदा मोठी कारवाई समोर आली आहे.

खार पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक तुषार काळे यांना लाच घेताना एसीबीने रंगेहात अटक केली. या घटनेमुळे मुंबई पोलीस दलात खळबळ उडाली असून पोलीस खात्यातील भ्रष्टाचाराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

एका प्रॉपर्टी प्रकरणात तक्रारदाराच्या बाजूने चौकशी अहवाल देण्यासाठी तुषार काळे यांनी ३ लाख रुपयांची लाच मागितली होती. ठरल्याप्रमाणे दीड लाख रुपयांचा पहिला हप्ता स्वीकारताना एसीबीने सापळा रचून त्यांना अटक केली.

हे प्रकरण मुंबईतील वांद्रे न्यायालयाशी संबंधित असून त्याची चौकशी करण्याची जबाबदारी काळे यांच्यावर होती. मात्र, चौकशी अहवाल तक्रारदाराच्या बाजूने देण्यासाठी त्यांनी लाचेची मागणी केल्याचे उघड झाले. तक्रारदाराच्या तक्रारीनंतर एसीबीने सापळा रचत कारवाई केली आणि काळे यांना रंगेहात पकडले.

## संपादकीय

# धर्मांतरण विरोधी विधेयक आणि स्वातंत्र्याची भावना



**धर्मांतरणावर राज्यस्तरावर नियंत्रण आणण्याच्या प्रस्तावित विधेयकांवर चाललेली चर्चा ही नागरिकांच्या मूलभूत स्वातंत्र्याशी निगडित आहे. कोणत्या कारणाने, कोणत्या हेतूने आणि कोणत्या सीमा राखून हा प्रश्न पाठीमागे ढकलायचा हेच आता राजकीय आणि सामाजिक दोन्ही स्तरावर मोठे प्रश्न बनले आहेत.**

भारतात धर्म आणि धर्मीय स्वातंत्र्य यांचा प्रश्न संवेदनशीलच नाही, तर वेळोवेळी राजकीय तापमानही वाढवणारा ठरला आहे. सनातन काळापासून विविध धर्म, परंपरा आणि समाज यांचा जिव्हाळ्याचा भांडार एकत्र जुळलेला आहे. भारतीय राज्यघटनेने लोकांना धर्म, धर्मपरिवर्तन आणि धार्मिक आचार-व्यवहारांमध्ये स्वातंत्र्य दिले आहे हे स्वातंत्र्यच भारताच्या लोकशाही मूलभूत तत्त्वांपैकी एक आहे. त्यामुळे धर्मांतरणाच्या विषयावर कोणतेही विधेयक, नियंत्रण, किंवा निर्बंध यांची चर्चा सामाजिक, राजकीय आणि संवैधानिकदृष्ट्या बारकाईने पाहण्याची गरज आहे. सध्याचे विवाद साधारणपणे एका विशिष्ट विधेयकाभोवती केंद्रित आहेत, ज्याचा उद्देश आहे "धर्मांतरण विरोधी कायदे" कडक करणे. भारतीय राज्यघटनेत "धर्म स्वातंत्र्य" हा अधिकार मूलभूत मानला आहे. कोणत्याही व्यक्तीला आपल्या श्रद्धा, श्रद्धेचे पालन, किंवा धार्मिक विचार बदलण्याचा अधिकार आहे. हा अधिकार संविधानाने स्पष्टपणे संरक्षित केला आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा कायदा जो "धर्मपरिवर्तन प्रतिबंध" म्हणून दिसतो, तो विचारपूर्वक आणि काटेकोर न्यायिक परीक्षणासाठी येणे आवश्यक आहे. धर्मांतरण विरोधी विधेयकांचा ध्येय जर फक्त वैयक्तिक अधिकारांची मर्यादा आणणे असेल तर तो संविधानाच्या मूळ तत्त्वाशी विरोधी ठरेल. परंतु त्यामागे व्यापक धोरणात्मक हेतू असेल, जसे समाजातील गैरसमज, दबावाखाली निर्णय घेण्याची स्थिती, आणि आर्थिक प्रलोभने यांवर नियंत्रण, तर त्याविषयीची चर्चा अधिक प्रमाणिक आणि समग्र पद्धतीने व्हायला हवी. भारतात विविध धर्मीय समुदायांचे सहअस्तित्व हे लोकशाहीचा आणि सामाजिक समन्वयाचा पाया आहे. या प्रस्तावित विधेयकाला विरोध दर्शवणारे आणि समर्थन करणारे किती न्यायिक, संवैधानिक आणि सामाजिक दृष्टिकोन घेऊन आले आहेत आणि कोणती धोके व संधी यांच्याशी भारतीय लोकशाहीच्या संदर्भात सामना करावा लागतो आहे, हेही तपासून पहायला हवे. धर्मांतरण हे सदैव परस्पर स्वीकृतीवर आधारित, मुक्त इच्छेवर आधारित असावे, नाहीतर परिणाम सामाजिक असंतुलनाचे होऊ शकतात. कोणत्याही व्यक्तीला आपल्या श्रद्धांमध्ये बदल करण्याची स्वातंत्र्य हक्क देणे हा मूलभूत अधिकार आहे. कायद्याची रचना अशी असायला हवी की तो कोणत्याही व्यक्तीच्या मूलभूत अधिकाराचा भंग करणार नाही. धर्मांतरणाच्या नावाखाली गैरव्यवहारांची नोंद देशांतर्गत वर्षानुवर्षे झाली आहे. आर्थिक प्रलोभन, रोजगाराच्या आश्वासनाखाली, तसेच सामाजिक दबावाखाली लोकांना त्यांच्या मूळ श्रद्धा बदलण्यास भाग पाडल्याचे आरोप यापूर्वीही विविध काळात नोंदले गेले आहेत. सामाजिक न्यायासाठी आवश्यक सुधारणा करणे गरजेचं आहे. भारतात धर्मपरिवर्तनाचा प्रश्न संवेदनशील राहिलेला आहे. भारतातील सामाजिक एकात्मता आणि विविधता या तत्त्वावर आधारित आहे. कोणत्याही व्यक्तीला आपल्या भगवान, श्रद्धा व धर्माचा निर्णय घेण्याचे अधिकार दिले गेले आहेत, त्याच अर्थाने ही स्वातंत्र्याची बाब आहे. धर्मांतरण विरोधी विधेयकांचा उद्देश जरच कोणत्याही समाजात गैरव्यावहारिक दबावाखाली किंवा अनैतिक पद्धतीने झालेल्या बदलांना प्रतिबंध करणे असेल, तर त्याकरिता विद्यमान कायद्यांमध्ये आवश्यक दुरुस्त्या व विस्तृत न्यायप्रक्रियेस कर्मचारी आकारणे हे अधिक योग्य ठरेल. ज्यावेळी संविधान बनवण्यात आले तेव्हा धर्म आणि धर्मपरिवर्तनावर स्पष्ट स्वातंत्र्याचा अधिकार राखला गेला. हा अधिकार आजही कायम आहे; या अधिकाराचे रक्षण हे भारतीय लोकशाहीच्या टिकावाचे केंद्रबिंदू आहे. विधेयक खरोखरच कोणत्याही व्यक्तीवरील दबावाखालीच्या बदलांना टाळण्यासाठी बनवले जात असेल, तर त्यात सामाजिक निगा, आर्थिक दबाव, गैरव्यवहार यांच्यावर कारवाई करण्याची विशेष तरतूद असायला हवी. पण असं केल्यासही स्वातंत्र्याचा गोडवा, मतदारांचा अधिकार आणि भारतीय विविधतेचा पाया सुरक्षित राहील याची खात्री करणे हे महत्त्वाचे ठरेल. धर्मांतरण विरोधी विधेयकाचा प्रश्न फक्त कायदा किंवा राजकारणापुरता मर्यादित नाही; तो भारतीय लोकशाहीची भावना, स्वातंत्र्याची व्याख्या आणि सामाजिक संघटनेची मूलभूत संरचना या सगळ्यांशी निगडित आहे. त्यामुळे यावर कोणताही निर्णय घेताना व्यापक चर्चा, न्यायिक परीक्षण आणि संसदीय वृत्ती आवश्यक आहे. कारण भारतात धर्मपरिवर्तनाविषयीची चर्चा विसंगती, गैरसमज किंवा गैरव्यवहार यांच्याऐवजी स्वातंत्र्य, समानता आणि न्याय या मूलभूत तत्त्वांचा आदर करून पुढे नेली पाहिजे. आणि तेव्हा हे प्रश्न सुटण्यास अधिक काळ लागणार नाही.

# राष्ट्रीय संदेश देणाऱ्या विधानसभा निवडणुका

भारतीय संघराज्याची रचना आणि कार्यप्रणाली राज्य निवडणुकींवर आधारित आहे. राज्यातील जनता कोणत्या पक्षाला मतदान करते, याचा थेट प्रभाव त्या राज्यातील प्रशासनावर होतो, मात्र याचा परिणाम फक्त राज्यपुरता मर्यादित राहत नाही. प्रत्येक राज्य निवडणूक केंद्र सरकारच्या धोरणांवर, राजकीय पक्षांच्या रणनीतीवर आणि पुढील राष्ट्रव्यापी राजकीय प्रवाहावर स्पष्ट संदेश देते. सध्या सुरू असलेल्या निवडणुकांचा अभ्यास याची स्पष्ट उदाहरणे देतो. राज्य निवडणुका नेहमीच स्थानिक आणि राष्ट्रीय राजकारणाचा संगम घडवतात. महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, केरळ आणि कर्नाटकसारख्या महत्वाच्या राज्यांमध्ये झालेल्या मतदारांच्या निर्णयांचा प्रभाव देशभरातील राजकीय संघटनांवर परिणाम करतो. जेव्हा एखाद्या पक्षाला राज्यात मोठ्या बहुमतीत सत्ता मिळते, तेव्हा त्याची केंद्रीय धोरणांवर प्रभावी छाया पडते. मतदारांचा हा संदेश राष्ट्रीय धोरणकर्त्यांसाठी एक लक्षणीय निर्देश असतो.

स्थानिक निवडणुकीत जनतेची आकांक्षा, समाजाच्या विविध घटकांचे हित, आर्थिक धोरणांची पडताळणी आणि केंद्रीय व राज्यस्तरीय योजना यांच्या परिणामाचे विश्लेषण करता येते. उदाहरणार्थ, पश्चिम बंगालमधील निवडणुका फक्त राज्यातील सत्ता संघर्षापुरत्या नव्हे, तर राष्ट्रीय राजकीय समीकरणांवर खोल परिणाम करणाऱ्या आहेत. या मतदानातून जे पक्ष राष्ट्रीय धोरणांवर प्रभाव पाडण्यास सक्षम ठरतो, तोच पुढील काळात केंद्रात आपली उपस्थिती अधिक दृढ करू शकतो.



**» भारतात विविध राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू असून, त्या देशाच्या राजकीय वातावरणावर परिणाम करणाऱ्या निवडणुका आहेत. या मतदानातून केंद्र आणि राज्य सरकारांच्या धोरणात्मक क्षमतेची चाचणीबरोबर राष्ट्रीय भावना स्पष्ट होणार आहे.**

या निवडणुकीत मतदारांची भूमिका खूप निर्णायक असते. स्थानिक प्रशासकीय यंत्रणा, विकासाच्या योजना, शिक्षण, आरोग्य, उद्योग व रोजगार या क्षेत्रातील कामगिरी यावर मतदार आपले मत देतात. मात्र, या मतदानाचे परिणाम राष्ट्रीय राजकारणाशी जोडले जातात. राष्ट्रीय स्तरावर सत्तेत असलेल्या पक्षासाठी राज्यांमधील सत्ता टिकवणे किंवा प्राप्त करणे हा एक धोरणात्मक आव्हान ठरतो.

सध्या केंद्रात सत्तेत असलेला पक्ष, विविध राज्यांमधील निवडणुकांचे निकष, सामाजिक आणि आर्थिक वातावरण, तसेच मतदारांच्या अपेक्षा यांचा अभ्यास करून पुढील धोरण आखतो. हे धोरण ठरवताना स्थानिक राजकीय परिस्थिती, मतदारांच्या बदलत्या विचारसरणीचा अंदाज आणि राष्ट्रीय राजकीय प्रवाह यांचा विचार केला जातो. त्यामुळे राज्य निवडणुका ही फक्त स्थानिक घटना नसून, राष्ट्रीय राजकारणाचा सूचक घटक ठरतात. राज्यांतील मतदारसंघीय रचना, सामाजिक घटक, धार्मिक आणि भाषिक विविधता यामुळे प्रत्येक राज्य निवडणूक वेगळी असते. मात्र त्यामध्येही एक गोष्ट सार्वत्रिक आहे, ती म्हणजे मतदारांचे अपेक्षांचे प्रतिबिंब. राज्य निवडणुकांचा परिणाम राष्ट्रीय धोरणकर्त्यांना सांगतो की नागरिकांच्या भावना, त्यांच्या गरजा आणि अपेक्षा कितपत पूर्ण होत आहेत. ही माहिती केंद्र सरकारसाठी पुढील धोरण ठरवण्यात अत्यंत उपयोगी ठरते. राज्य निवडणुकांमधील परिणामांनी काही वेळा राष्ट्रीय राजकीय रणनीतीत बदल घडवून आणले आहेत. एखाद्या राज्यात विरोधी पक्षाची सत्ता मिळाल्यास, त्या राज्यातील केंद्रीय योजना आणि निधी वितरण प्रक्रियेत बदल घडविला जाऊ शकतो. त्यामुळे राज्य निवडणुका ही स्थानिक प्रशासनासह राष्ट्रीय राजकीय संतुलन राखण्यात भूमिका बजावतात.

राज्य निवडणुका फक्त मतांच्या यंत्रणेवर आधारित नसतात. त्यामागे स्थानिक राजकारण, सामाजिक वातावरण, आर्थिक परिस्थिती आणि केंद्र-राज्य संबंध यांचा गुंतागुंतीचा परिणाम असतो. मतदारांचा संदेश स्पष्ट असतो; ते कोणत्या पक्षाची कामगिरी पसंत करतात आणि कोणत्या धोरणांना समर्थन देतात, हे निवडणूक निकालातून दिसून येते. हे केंद्र सरकार आणि राष्ट्रीय पक्षांसाठी महत्त्वपूर्ण संकेत ठरते.

या निवडणुकांमध्ये केंद्र सरकारच्या धोरणांचा परीक्षण होत आहे. मतदारांनी आपल्या मताद्वारे स्थानिक प्रशासनासह राष्ट्रीय धोरणांवरही आपली भूमिका मांडली आहे. यामुळे राज्य निवडणुका ही स्थानिक निर्णयप्रक्रियेतून राष्ट्रीय संदेश देणारी एक महत्वाची घटना ठरते. स्थानिक प्रशासनाच्या कामगिरीची पडताळणी, मतदारांच्या अपेक्षा, आर्थिक आणि सामाजिक धोरणांची परिणामकारकता या सर्वांचा अभ्यास या निवडणुकांद्वारे करता येतो.

राज्य निवडणुका ही फक्त स्थानिक सत्ता प्राप्तीपुरती मर्यादित नसून, देशाच्या राजकीय वातावरणावर खोल परिणाम करणारी प्रक्रिया आहे. मतदारांचे संकेत, त्यांचे प्राधान्यक्रम आणि त्यांच्या अपेक्षा या सर्वांचा विचार करून केंद्र सरकार आणि राष्ट्रीय पक्ष पुढील रणनीती आखतात. त्यामुळे राज्य निवडणुका ही स्थानिक आणि राष्ट्रीय राजकारणाचा संगम ठरतात आणि त्यातून मिळालेला संदेश संपूर्ण देशासाठी महत्त्वाचा ठरतो. राष्ट्रीय राजकारणाची लँडस्केप स्पष्ट करणारी ही प्रक्रिया आहे. मतदारांचा संदेश, त्यांच्या अपेक्षा, स्थानिक प्रशासनाची कामगिरी आणि राष्ट्रीय धोरण यांचा अभ्यास करून पुढील राजकीय दिशा ठरवली जाते. त्यामुळे सध्या सुरु असलेल्या निवडणुकांचा अभ्यास करणे केवळ स्थानिक नाही, तर राष्ट्रीय राजकारणासाठी अत्यंत आवश्यक ठरते.

# डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्वीकारला पदभार

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तपदी नियुक्ती

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी** : डॉ. विजय नामदेव सूर्यवंशी यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारला. त्यांनी मावळते आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्याकडून पदभार स्वीकारत प्रशासनाची सूत्रे हाती घेतली.

या वेळी महापौर रवि लांडगे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, नगरसेवक संदीप कस्पटे, बाबासाहेब त्रिभुवन तसेच अन्य लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी डॉ. सूर्यवंशी यांचे स्वागत केले.

पदभार स्विकारल्यानंतर महापौर रवि लांडगे, मावळते आयुक्त श्रावण हर्डीकर आणि नव्या आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्यात शहरातील विविध विकास प्रकल्प, नागरी सुविधा आणि महापालिकेच्या सुरू असलेल्या कामकाजाबाबत सविस्तर चर्चा झाली. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू असलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती देणे, नागरिकांना अधिक दर्जेदार सेवा उपलब्ध करून देणे आणि प्रशासनाचे कामकाज अधिक प्रभावी व गतिमान करण्यावर या बैठकीत भर देण्यात आला.

डॉ. सूर्यवंशी यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेतला. शहराच्या विकासासाठी प्रशासनात समन्वय साधून अधिक परिणामकारक पद्धतीने काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. सध्या शहरातील पाणीस्थिती गंभीर असल्याचे नमूद करत त्यांनी विविध प्रलंबित प्रकल्पांना गती देण्याचे संकेत दिले. भामा आसखेड पाईपलाईन प्रकल्पासाठी नव्याने निविदा काढण्याची प्रक्रिया लवकरच राबविण्यात येणार असून उर्वरित काम सात महिन्यांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

तसेच पवना बंद पाईपलाईन प्रकल्प प्रलंबित असून तो पुन्हा सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. सध्या निघोजे बंधाऱ्यातून उचलण्यात येणाऱ्या पाण्याच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित होत असल्याने पर्यायी जलस्रोतांचा शोध घेण्यावर प्रशासनाने भर दिला आहे. याच अनुषंगाने ठोकळवाडी आणि मुळशी धरणांतून पाणी आणण्याचा आराखडा तयार करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून दरवर्षी सुमारे दीड लाखांची भर पडत असल्याने भविष्यातील पायाभूत सुविधांवर मोठा ताण येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. सध्या शहराची लोकसंख्या सुमारे ३८ लाखांच्या घरात पोहोचल्याने जलपुरवठा, मलनिस्सारण आणि नागरी सुविधांचे नियोजन व्यापक पातळीवर करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

# गॅस एजन्सी सरकारी देखरेखीखाली चालवा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : शहरात एलपीजी गॅस सिलिंडरच्या वितरणात होत असलेल्या विलंब, साठेबाजी आणि काळाबाजाराच्या तक्रारी वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर गॅस एजन्सी प्रशासनाच्या देखरेखीखाली चालवाव्यात, अशी मागणी आमदार हेमंत रासने यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना निवेदन दिले आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पुण्यात घरगुती एलपीजी गॅस सिलिंडर वेळेवर मिळत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून येत आहेत. काही एजन्सीकडून कृत्रिम टंचाई निर्माण करणे, सिलिंडर वितरणात विलंब करणे तसेच जास्त दराने विक्री करून काळाबाजार केल्याचे प्रकार समोर येत असल्याचे रासने यांनी निवेदनात नमूद केले आहे.

शहरातील सर्व गॅस एजन्सींची तातडीने तपासणी करून त्या तात्पुरत्या स्वरूपात जिल्हा प्रशासनाच्या नियंत्रणाखाली चालवाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच गॅस साठा, वितरण आणि दर यावर देखरेख ठेवण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, असेही त्यांनी सुचवले आहे.

# दिव्यांग भवन फाउंडेशनला महापौर रवि लांडगे यांची भेट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : दिव्यांग नागरिकांचे सक्षमीकरण करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे ही महत्त्वाची जबाबदारी असून त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन रवि लांडगे यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित दिव्यांग भवन फाउंडेशनला भेट देताना त्यांनी हे मत व्यक्त केले.

महापौर रवि लांडगे यांनी दिव्यांग भवन फाउंडेशनच्या कामकाजाचा आढावा घेत विविध सुविधा, उपचार पद्धती आणि पुनर्वसन उपक्रमांची पाहणी केली. दिव्यांग बांधवांना दर्जेदार आरोग्य सेवा, पुनर्वसन सुविधा तसेच आवश्यक प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी



सामाजिक संस्थांच्या सहकार्याने काम करण्यावर त्यांनी भर दिला. यावेळी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख, महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त निवेदिता घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी, पूजा भापकर तसेच विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

महापौरांनी दिव्यांग भवन परिसरातील उपचार कक्ष, प्रशिक्षण विभाग आणि उपलब्ध सेवा-सुविधांची पाहणी केली. फिजिओथेरपी, समुपदेशन सेवा, विशेष प्रशिक्षण तसेच पुनर्वसनाशी संबंधित विविध उपचार पद्धतींबाबत त्यांनी सविस्तर माहिती घेतली. दिव्यांग नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा अधिक प्रभावी आणि सुलभ पद्धतीने विस्तार करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच या सुविधांचा जास्तीत जास्त नागरिकांना लाभ मिळावा यासाठी सेवा विस्तारावर विशेष भर देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

## शहरातील पाणीपुरवठा, विद्युत देखभाल तसेच सीसीटीव्ही यंत्रणेच्या दुरुस्तीला मान्यता

# स्थायी समितीत विविध विकासकामांना मान्यता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थायी समितीच्या बैठकीत शहरातील विविध विकासकामे, पाणीपुरवठा, विद्युत देखभाल तसेच सीसीटीव्ही यंत्रणांच्या दुरुस्तीशी संबंधित प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात झालेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे होते. या बैठकीला आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, नगरसचिव मुकेश कोळप, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर तसेच स्थायी समिती सदस्य आणि महापालिका अधिकारी उपस्थित होते.



बैठकीत शहरातील विविध विकासकामांवर चर्चा करून त्यांना मंजुरी देण्यात आली. स्थापत्य विभागामार्फत प्रभाग क्रमांक २ मधील परिसरात छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळा परिसराचे सुशोभीकरण व कलात्मक कामे करण्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. यासोबतच त्या परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई तसेच एआर-व्हीआर तंत्रज्ञानासह विद्युत कामांसाठीही मंजुरी देण्यात आली. तसेच यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, महापालिकेच्या शाळा, प्रशासकीय इमारती आणि विविध प्रभागांमध्ये बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही यंत्रणांच्या वार्षिक देखभाल व दुरुस्तीच्या निविदांनाही मंजुरी देण्यात आली. पाणीपुरवठा यंत्रणा, पंपहाऊस, ट्रान्सफॉर्मर आणि विद्युत यंत्रणांशी संबंधित विविध कामांसाठीच्या खर्चालाही मान्यता देण्यात आली.

महापालिकेच्या इमारती, शाळा आणि दवाखान्यांमधील पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता करण्याच्या कामास मुदतवाढ देण्यासही समितीने संमती दिली. तसेच पुणे महानगर परिवहन महामंडळच्या कर्मचाऱ्यांच्या सातव्या वेतन आयोगाच्या फरक रकमेच्या दुसऱ्या हप्त्यासाठी महापालिकेच्या वाट्याचा निधी अग्रिम स्वरूपात देण्यास मंजुरी देण्यात आली.

बैठकीत शहराच्या पायाभूत सुविधा, विकासकामे आणि प्रशासनाशी संबंधित विविध विषयांवर चर्चा करून आवश्यक निर्णय घेण्यात आले. याशिवाय स्थायी समिती सदस्यांच्या उपसूचनांसह महापालिकेच्या अंदाजपत्रकासही मान्यता देण्यात आली.

बोऱ्हाडेवाडी, मोशी येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळा परिसराच्या सुशोभीकरणासाठी स्थापत्य व विद्युत कामांवर एकूण ५० कोटी रुपयांच्या दोन प्रस्तावांना यापूर्वी विरोध करण्यात आला होता. हे दोन्ही प्रस्ताव मंजूर करण्यात आले. या संदर्भात स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे म्हणाले की, गेल्या चार दिवसांत विरोधकांनी या कामांबाबत केवळ राजकारण केले. पारदर्शक कारभारासाठी हे विषय तहकूब ठेवण्यात आले होते. आमच्या अस्मितेचा मुद्दा म्हणून हे विषय मंजूर करण्यात आले, असे त्यांनी स्पष्ट केले.

# अफवांवर विश्वास ठेवू नका; आमदार शंकर जगताप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : आखाती देशातील तणावाच्या पार्श्वभूमीवर शहरात गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्याच्या चर्चांमुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर शंकर जगताप यांनी अन्नपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. शहरात गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत आहे, त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन त्यांनी केले.

गेल्या काही दिवसांपासून गॅस टंचाईच्या अफवांमुळे शहरातील विविध गॅस एजन्सीसमोर नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र दिसून येत होते. काही ठिकाणी गॅस उपलब्ध नसल्याच्या तक्रारी वाढल्याने नागरिकांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. आमदार जगताप यांनी अन्नपुरवठा परिमंडळ अधिकारी विजयकुमार क्षीरसागर आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक बोलावली.

बैठकीत शहरातील गॅस साठा, वितरण व्यवस्था आणि पुरवठ्याची सद्यस्थिती याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. नागरिकांना गॅससाठी रांगेत उभे राहावे लागत असल्यास किंवा कुठेही काळाबाजार होत असल्याचे आढळल्यास ती बाब खपवून घेतली जाणार नाही, अशा कडक सूचना आमदारांनी प्रशासनाला दिल्या.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### भिगवणमध्ये चहाच्या दरात ५ रुपयांची वाढ

**भिगवण** : भिगवण व परिसरातील चहाप्रेमींना आता चहासाठी अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. स्थानिक चहा व्यावसायिकांनी एकत्रितपणे घेतलेल्या निर्णयानुसार चहाचा दर १० रुपयांवरून वाढवून १५ रुपये करण्यात आला आहे. अलीकडेच झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून शहरातील अनेक हॉटेल्स, टपऱ्या आणि चहाच्या स्टॉलवर नव्या दराची अंमलबजावणी सुरू झाली आहे. गेल्या काही महिन्यांपासून महागाईत सातत्याने होत असलेल्या वाढीमुळे चहा व्यवसायिकांवर आर्थिक ताण वाढत होता. चहा बनवण्यासाठी लागणारी चहा पावडर, साखर, दूध आणि एलपीजी गॅस यांच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. याशिवाय वीज बिल, दुकानांचे भाडे तसेच कामगारांचे वेतनही वाढल्याने जुन्या दरात व्यवसाय चालवणे कठीण होत असल्याचे व्यावसायिकांनी स्पष्ट केले. दरवाढीचा निर्णय एकमुखाने घेण्यात आला असून सर्वांनी त्याची अंमलबजावणी करण्याचे ठरवले आहे.

### भीषण अपघातात तिघांचा जागीच मृत्यू

**पुणे** : पुणे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर इंदापूर तालुक्यातील लोणी देवकर परिसरात क्रुझर जीप आणि ट्रक यांच्यात झालेल्या भीषण अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तिघे जण क्रुझर गाडीतून प्रवास करत असताना अचानक गाडीचा टायर फुटला. त्यामुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि गाडी रस्ता दुभाजक ओलांडून समोरून येणाऱ्या ट्रकवर जाऊन आदळली. धडक इतकी भीषण होती की क्रुझर गाडीचा समोरील भाग पूर्णपणे चकनाचूर झाला आणि गाडीत अडकलेल्या तिघांचाही जागीच मृत्यू झाला. या अपघातात मृत झालेल्यांमध्ये प्रमोद बाळासो खवळे (वय २८, रा. मदनवाडी, ता. इंदापूर), शशांक कोटिया (वय ३२, रा. गौतमनगर, गिरड, ग्वालियर, मध्य प्रदेश) आणि विजयसिंह राजपूत (वय ३५, रा. त्रिलोकनगर, मध्य प्रदेश) यांचा समावेश आहे. हे तिघेही लोणी देवकर एमआयडीसी परिसरातील एका खासगी कंपनीत कार्यरत होते. दरम्यान, अपघातामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

### साखर उद्योगानी घेतली केंद्राकडे धाव

# इथेनॉल प्रकल्पांचे व्याज अनुदान रखडले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : देशातील साखर उद्योगासाठी महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या इथेनॉल उत्पादन प्रकल्पांना देण्यात येणाऱ्या व्याज अनुदानाच्या वितरणात तब्बल दोन वर्षांचा विलंब झाल्याने साखर कारखानदारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर साखर उद्योगाने केंद्र सरकारकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली असून, प्रलंबित अनुदान लवकरात लवकर वितरित करावे, अशी भूमिका मांडली आहे.

केंद्र सरकारने इथेनॉल मिश्रण धोरणाला चालना देण्यासाठी साखर कारखान्यांना मोठ्या प्रमाणावर कर्ज घेऊन डिस्टिलरी प्रकल्प उभारण्यास प्रोत्साहन दिले होते. या प्रकल्पांसाठी घेतलेल्या कर्जावरील व्याजाचा काही हिस्सा सरकारकडून अनुदानाच्या स्वरूपात देण्याची तरतूद करण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात हे अनुदान वेळेवर मिळत नसल्याने कारखान्यांच्या आर्थिक गणितावर मोठा परिणाम होत आहे.

साखर उद्योगातील अनेक कारखान्यांनी इथेनॉल उत्पादनासाठी मोठी गुंतवणूक केली आहे. उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी नव्या यंत्रणा उभारल्या, तसेच जुने प्रकल्प आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत आणले. परंतु, व्याज अनुदान वेळेत न मिळाल्याने कर्जफेडीचा ताण वाढला असून कार्यरत भांडवलावरही परिणाम झाला आहे. काही कारखान्यांना तर बँकांकडून अतिरिक्त कर्ज मिळवताना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे उद्योगातील सूत्रांचे म्हणणे आहे.

दरम्यान, केंद्र सरकारने २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट ठेवले असून त्यासाठी साखर उद्योगावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहावे लागणार आहे. अशा परिस्थितीतच अनुदान वितरणात होत असलेला विलंब उद्योगासाठी धोक्याची घंटा मानला जात आहे. जर वेळेत अनुदान मिळाले नाही, तर इथेनॉल उत्पादन वाढवण्याचे उद्दिष्ट साध्य होण्यात अडथळे निर्माण होऊ शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

साखर उद्योग संघटनांनी केंद्र सरकारकडे केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, इथेनॉल प्रकल्प हे दीर्घकालीन गुंतवणुकीचे प्रकल्प असून त्यासाठी स्थिर आणि विश्वासार्ह धोरणांची आवश्यकता आहे. व्याज अनुदानासारख्या महत्त्वाच्या घटकात विलंब झाल्यास उद्योगातील गुंतवणुकीचा वेग कमी होऊ शकतो. तसेच नव्या प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्याची कारखानदारांची तयारीही कमी होण्याची शक्यता आहे.

याशिवाय, इथेनॉल उत्पादनामुळे साखरेचा अतिरिक्त साठा कमी करण्यास मदत होते आणि शेतकऱ्यांना उसाचा योग्य मोबदला देण्यासही हातभार लागतो. त्यामुळे या क्षेत्राला चालना देणे सरकारसाठीही महत्त्वाचे आहे. अनुदान वेळेत मिळाल्यास कारखान्यांची आर्थिक स्थिती सुधारेल आणि शेतकऱ्यांनाही त्याचा अप्रत्यक्ष लाभ होईल, असे मत तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

सध्या देशातील अनेक साखर कारखान्यांचे कोट्यवधी रुपयांचे व्याज अनुदान प्रलंबित असून त्याचा परिणाम त्यांच्या दैनंदिन आर्थिक व्यवहारांवर होत आहे. त्यामुळे केंद्र सरकारने तातडीने निर्णय घेऊन प्रलंबित अनुदान वितरित करावे, तसेच भविष्यात अशा विलंबाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी ठोस यंत्रणा उभी करावी, अशी मागणी उद्योगाकडून जोर धरत आहे.

## श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाची सांगता



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी** : तीर्थक्षेत्र आळंदी येथे ज्येष्ठ नागरिक व आदर्श माता विमलकाकू गोपाळराव कुऱ्हाडे पाटील यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ संगीत सोहळ्याचे आयोजन हरिनाम गजरात करण्यात आले. या संगीतमय ज्ञानयज्ञ सोहळ्याची सांगता माऊली महाराज सावर्डेकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. संपूर्ण कार्यक्रमात भजन, कीर्तन, प्रवचन आणि भागवत कथेमुळे आळंदी परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. या सोहळ्याचे आयोजन माजी नगराध्यक्ष विलासराव कुऱ्हाडे पाटील, ज्ञानेश्वर शिक्षण संस्थाचे विश्वस्त योगेंद्र कुऱ्हाडे पाटील, भैरवनाथ उत्सव कमेटी आळंदीकर ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष शंकरराव कुऱ्हाडे पाटील, तसेच रामभाऊ कुऱ्हाडे पाटील मित्रपरिवार आणि आळंदी ग्रामस्थ यांच्या वतीने करण्यात आले होते. सोहळ्यात शास्त्रीय संगीत गायन, भजन आणि भागवत कथा यांचे सादरीकरण उत्साहात झाले. भाविक आणि नागरिकांनी श्रवणसुखाची अनुभूती घेतली. आळंदी पंचक्रोशीसह राज्यभरातील नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार, भजन गायक, वादक आणि साधक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान विविध क्षेत्रातील मान्यवरांचा शाल, उपरणे आणि श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच अन्नदान सेवेत हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## कांदा पिकाला पाण्याचा ताण; शेतकऱ्यांची चिंता वाढली



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्यात रब्बी हंगामातील प्रमुख नगदी पीक असलेल्या कांद्याला सध्या पाण्याचा तीव्र ताण जाणवू लागला आहे. तालुक्याच्या पूर्व भागातील अनेक गावांमध्ये मीना नदीचे पात्र पूर्णपणे कोरडे पडले असून विहिरींची पाणीपातळीही मोठ्या प्रमाणात घटली आहे. परिणामी शेतकऱ्यांना पिकांना पाणी देणे कठीण झाले आहे.

या भागात कांदा हे मुख्य नगदी पीक असून बहुतांश शेतकरी रब्बी हंगामात मोठ्या प्रमाणावर कांद्याची लागवड करतात. मात्र यंदा पाण्याअभावी कांदा पिकावर संकट ओढवले आहे. शिंगवे गावातील गाढवे मळा परिसरात अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील कांदा पिके पाण्याअभावी होरपळू लागली आहेत.

वेळेवर पाणी न मिळाल्याने कांद्याची वाढ खुंटत असून उत्पादनावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. कांद्याबरोबरच मका आणि चारा पिकांनाही पाण्याचा मोठा फटका बसत आहे. चारा पिकांना पाणी न मिळाल्याने पशुधनासाठी हिरव्या चाऱ्याची टंचाई निर्माण होऊ लागली आहे. त्यामुळे दूध उत्पादनात घट होत असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

मीना नदी कोरडी पडणे आणि विहिरी आटण्याच्या स्थितीमुळे शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे. अनेक ठिकाणी शेतकरी उरलेल्या मर्यादित पाण्यावर पिके वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र पावसाळा अद्याप दूर असल्याने पुढील काही दिवसांत परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता शेतकरी अर्जुन गाढवे यांनी व्यक्त केली.

## वळतीत मुक्तादेवी यात्रेनिमित्त बैलगाडा शर्यती

### सावलीच्या मांडवामुळे शौकिनांना दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव** : वळती (ता. आंबेगाव) येथील ग्रामदैवत मुक्तादेवी यात्रा निमित्त पारंपरिक बैलगाडा शर्यतींचे उत्साहात आयोजन करण्यात आले आहे. उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेता शर्यती पाहण्यासाठी येणाऱ्या प्रेक्षकांना आणि बैलगाडा शौकिनांना दिलासा मिळावा, यासाठी यात्रा समितीच्या वतीने घाटाच्या दुतर्फा कापडी मांडव उभारण्यात आले आहेत.

यंदा यात्रेनिमित्त मंगळवार (दि. १७) आणि बुधवार (दि. १८) असे दोन दिवस शर्यतींचे आयोजन करण्यात आले आहे. वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर प्रेक्षकांना त्रास होऊ नये, यासाठी घाटाच्या दोन्ही बाजूंना सावलीची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे बैलगाडा प्रेमी सावलीत बसून शर्यतींचा आनंद लुटताना दिसत आहेत. या शर्यतींमध्ये सुमारे ३०० हून अधिक बैलगाडा मालकांनी सहभाग नोंदवला असून स्पर्धेसाठी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. विविध गावांमधून मोठ्या संख्येने शौकिन उपस्थित राहत असून पारंपरिक बैलगाडा संस्कृतीचा जल्लोष अनुभवायला मिळत आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांत प्रेक्षकांसाठी करण्यात आलेल्या सावलीच्या व्यवस्थेमुळे बैलगाडा शौकिन आणि मालकांनी समाधान व्यक्त केले असून यात्रा समिती तसेच वळती ग्रामस्थांचे आभार मानले आहेत.

## आंबेगावात मीना नदीपात्रात मासेमारीला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातून वाहणाऱ्या मीना नदीच्या पात्रात सध्या पाण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटले आहे. उन्हाळ्यामुळे नदीतील पाणी आटत चालल्याने अनेक ठिकाणी डोह तयार झाले असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर मासे आढळत आहेत. त्यामुळे या परिसरात सध्या मासेमारीला वेग आला आहे.

या मासेमारीमुळे भिल्ल, कातकरी आणि ठाकर समाजातील मच्छीमारांना रोजगाराचे साधन उपलब्ध झाले आहे. अनेक कुटुंबे सकाळपासून संध्याकाळपर्यंत नदीपात्रात मासेमारी करताना दिसून येतात. काही मच्छीमार शेजारील शिरूर आणि जुन्नर तालुक्यांतूनही येथे येत आहेत. ते सकाळी लवकर नदीपात्रात येऊन दिवसभर मासेमारी करतात आणि मिळालेले मासे जवळच्या गावांमध्ये विक्रीसाठी नेतात. मीना नदीतील मासे ताजे आणि चवदार असल्याने गावांमधील ग्राहक त्यांची उत्साहाने खरेदी करत आहेत. त्यामुळे मच्छीमारांना चांगला दर मिळत असून त्यांच्या उत्पन्नातही वाढ होत आहे. काही ठिकाणी ग्राहक थेट नदीपात्रात येऊन मासे खरेदी करत असल्याचे चित्र दिसत आहे.

मासेमारीदरम्यान विविध प्रकारचे मासे मिळत असून त्याचबरोबर खेकडे आणि 'वाम'ही मोठ्या प्रमाणावर मिळत आहेत. उन्हाळ्याच्या सुरुवातीला नदीतील पाणी कमी झाल्याने पारंपरिक मासेमारीच्या माध्यमातून अनेक कुटुंबांना तात्पुरता का होईना रोजगार उपलब्ध होत आहे.

## जेजुरी औद्योगिक वसाहतीत उद्योग अडचणीत

### आखाती युद्धाचा फटका; गॅस पुरवठ्यातील तुटवड्याचा फटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जेजुरी** : अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा थेट परिणाम देशातील औद्योगिक क्षेत्रावर होत असून जेजुरी औद्योगिक वसाहतीतील उद्योगांना त्याचा मोठा फटका बसत आहे. गॅस पुरवठ्यात निर्माण झालेल्या तुटवड्यामुळे उत्पादन प्रक्रियेवर परिणाम झाला असून अनेक उद्योग अडचणीत सापडले आहेत.

जेजुरी औद्योगिक वसाहतीत सुमारे दोनशे कारखाने कार्यरत असून त्यामध्ये लघुउद्योगांचे प्रमाण अधिक आहे. या वसाहतीत सुमारे आठ हजार कामगार रोजगारावर आहेत. विशेष म्हणजे, फॅब्रिकेशन आणि इंजिनिअरिंग क्षेत्रातील उद्योगांचे प्रमाण सुमारे सत्तर टक्के आहे. या उद्योगांना उत्पादन प्रक्रियेसाठी मोठ्या प्रमाणावर एलपीजी गॅसची आवश्यकता असते. मात्र, आखाती देशांतील संघर्षामुळे गॅस पुरवठा विस्कळीत झाल्याने उत्पादनावर गंभीर परिणाम होत आहे.

गॅसचा पुरवठा कमी झाल्याने अनेक उद्योगांनी पर्याय म्हणून ऑक्सिजन गॅसचा वापर सुरू केला आहे. मात्र हा पर्याय खर्चिक ठरत असून उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. काही उद्योगांमध्ये उत्पादन पूर्णतः ठप्प होण्याच्या मार्गावर असून, परिस्थिती अशीच राहिल्यास उद्योग बंद पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परिणामी कामगार कपातीचे संकटही निर्माण होऊ लागले आहे.

औद्योगिक वसाहतीतील मोठ्या कारखान्यांमध्ये कामगारांसाठी कॅन्टीनची सुविधा उपलब्ध असते. मात्र, एलपीजी गॅस सिलिंडरच्या तुटवड्यामुळे कॅन्टीन व्यवस्था कोलमडली आहे. बाहेरून येणाऱ्या कामगारांसाठी अन्नाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. काही दिवसांत गॅस पुरवठा सुरळीत न झाल्यास कॅन्टीन बंद ठेवावी लागण्याची शक्यता आहे.

युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्यातीवरही परिणाम झाला आहे. जेजुरी औद्योगिक वसाहतीतील अनेक उद्योगांचा माल आखाती देशांत पाठविला जातो. मात्र, सध्या मालाचे कंटेनर बंदरांवर अडकून पडले आहेत. तसेच पेट्रोकेमिकल्ससारख्या महत्त्वाच्या कच्च्या मालाच्या आयातीवरही परिणाम झाल्याने उत्पादन प्रक्रिया विस्कळीत झाली आहे.

कच्चा माल वेळेत उपलब्ध होत नसल्याने उद्योजकांना वाढीव दराने तो मिळवावा लागत आहे. त्यामुळे उत्पादन खर्च वाढून उद्योगांची आर्थिक कोंडी होत आहे.

आखाती देशांतील युद्ध लवकर थांबले नाही, तर जेजुरी औद्योगिक वसाहतीतील अनेक उद्योग बंद पडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यामुळे हजारो कामगारांच्या रोजगारावर गदा येण्याची शक्यता असून उद्योजकांसमोरही मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

### अटी शिथिल करण्याची कारखान्यांची मागणी

# साखर निर्यात कोट्यावर बंधन; उद्योगातून नाराजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : केंद्र सरकारने ८७ हजार ५८७ मेट्रिक टन अतिरिक्त साखर निर्यातीस परवानगी दिली असली, तरी ही निर्यात ३० जून २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे बंधन घातल्याने साखर उद्योगातून नाराजी व्यक्त होत आहे. जागतिक बाजारपेठेत साखरेचे दर सुधारण्याची संधी निर्माण झाली असताना अशा जाचक अटी लादल्यामागे उत्तरेकडील खाजगी साखर लॉबीचा दबाव असल्याची चर्चा उद्योगात सुरू आहे. त्यामुळे निर्यातीवरील तारखांचे बंधन शिथिल करावे, अशी मागणी राज्यातील साखर कारखानदारांकडून होत आहे. केंद्र सरकारने देशातील १७ साखर कारखान्यांना त्यांच्या मागणीनुसार हा अतिरिक्त निर्यात कोटा मंजूर केला असून त्यापैकी महाराष्ट्रातील १३ कारखान्यांना ७१ हजार ७०७ मेट्रिक टन साखर निर्यातीचा वाटा देण्यात आला आहे. केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाचे उपसचिव सुरेश कुमार यांनी काढलेल्या आदेशात ३० जून २०२६ पर्यंत निर्यात पूर्ण करण्याची अट स्पष्ट करण्यात आली आहे. दरम्यान, इराणमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या असून त्याचा परिणाम साखर उद्योगावरही होत आहे. ब्राझील हा प्रमुख ऊस उत्पादक देश असून त्यांचा नवीन हंगाम एप्रिलपासून सुरू होणार आहे. वाढलेल्या इंधन दरांच्या पार्श्वभूमीवर ब्राझील साखरेऐवजी इथेनॉल उत्पादनाला प्राधान्य देण्याची शक्यता आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर साखरेची मागणी वाढून भारताला निर्यातीची मोठी संधी उपलब्ध होऊ शकते, असे जाणकारांचे मत आहे.

अशा परिस्थितीत केंद्र सरकारकडून लादण्यात आलेल्या वेळेच्या बंधनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. यापूर्वी २०२५-२६ हंगामासाठी १५ लाख मेट्रिक टन साखर निर्यातीचा कोटा जाहीर करण्यात आला होता. त्यावेळी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली होती. मात्र, त्या वेळी जागतिक बाजारात दर घसरलेले असल्याने अपेक्षित निर्यात झाली नाही. केवळ ४ ते ५ लाख मेट्रिक टन साखरेचे करार होऊन प्रत्यक्ष निर्यात सुमारे अडीच लाख मेट्रिक टनांवरच मर्यादित राहिली. यानंतर १३ फेब्रुवारी २०२६ रोजी अतिरिक्त पाच लाख मेट्रिक टन निर्यातीस परवानगी देताना कारखान्यांना १५ दिवसांत तयारी दर्शवण्याची अट घालण्यात आली आणि त्यालाही ३० जून २०२६ पर्यंतचीच मुदत देण्यात आली. राज्यातील भगवंतनगर, दीनदयाळनगर, वांबोरी, भेंडे, सूर्यनगर, वाकोडी, शरयू ॲग्रो, भवानीनगर, श्री श्री शुगर, जय श्रीराम, पाटेठाण आणि श्रीगोंदा या कारखान्यांना एकूण ७१ हजार ७०७ मेट्रिक टन कोटा देण्यात आला आहे. तर कर्नाटक, गुजरात आणि उत्तर प्रदेशमधील काही कारखान्यांना मिळून १५ हजार ८८० मेट्रिक टन कोटा देण्यात आला आहे.

## ओतुर येथे परीक्षा केंद्रात विद्यार्थ्यावर कोयत्याने हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर** : येथील गाडगे महाराज विद्यालय येथे दहावीच्या परीक्षा केंद्रात वर्गात घुसून एका परीक्षार्थी विद्यार्थ्यावर अल्पवयीन मुलाने कोयत्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना सोमवारी सकाळी घडली. या हल्ल्यात विद्यार्थी जखमी झाला असून जुन्या वादातून ही घटना घडल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. घटनेमुळे ओतूर आणि परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

ही घटना सोमवारी (दि. १६) सकाळी सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास घडली. त्या वेळी सकाळी ११ ते १ या वेळेत इतिहासाचा पेपर होणार होता. नेहमीप्रमाणे साडेदहा वाजता शाळेची घंटा झाल्यानंतर विद्यार्थी आपल्या वर्गात गेले होते. याच वेळी हल्लेखोर अल्पवयीन मुलगा गळ्यात शाळेची बॅग अडकवून चार साथीदारांसह वर्गात शिरला. वर्गाचा दरवाजा बंद करून त्याने दप्तरातून कोयता काढत संबंधित विद्यार्थ्यावर हल्ला चढविला. मात्र विद्यार्थ्याने हा हल्ला हातावर झेलल्याने मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि हल्लेखोर अल्पवयीन मुलास कोयत्यासह ताब्यात घेतले. हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्हीमध्ये कैद झाला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## सारांश वृत्त

### सीपीआय (एमएल) १० जागांवर लढणार

**रांची :** सीपीआय (एमएल) लिबरेशनचे सरचिटणीस दिपांकर भट्टाचार्य यांनी मंगळवारी सांगितले की, पक्ष पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत डाव्या आघाडीचा भाग म्हणून १० जागांवर निवडणूक लढवेल. त्यांनी असाही आरोप केला की, पश्चिम बंगालमधील ६० लाखांहून अधिक 'प्रलंबित' मतदारांना निवडणुकीत मतदान करता येईल, हे सुनिश्चित करण्यात निवडणूक आयोग अपयशी ठरला आहे.

### राजस्थान येथे २२ लाख बेरोजगार

**जयपूर :** माहिती अधिकार कायद्याअंतर्गत मिळालेल्या माहितीनुसार, राजस्थानमधील रोजगार कार्यालयांमध्ये सध्या २२ लाखांहून अधिक बेरोजगार तरुणांची नोंदणी झाली आहे. पुढे असेही उघड झाले की, गेल्या पाच वर्षांत रोजगार कार्यालयांमार्फत शासकीय क्षेत्रात एकाही उमेदवाराची भरती झाली नाही. रोजगार संचालनालयाने दिलेल्या आकडेवारीनुसार, १४ जानेवारीपर्यंत राज्यभरातील जिल्हा रोजगार कार्यालयांमध्ये एकूण २२,२१,३१७ उमेदवार नोकरी शोधणारे म्हणून नोंदणीकृत होते. यांपैकी १३.०८ लाखांहून अधिक पुरुष, ९.१२ लाख महिला होत्या आणि ९८९ जण 'इतर' प्रवर्गात मोडत होते.




### डॉक्टरावर हल्ला, दोघांना अटक

**भोपाळ :** भेसळयुक्त कल्याणी (पश्चिम बंगाल): (१७ मार्च) पश्चिम बंगालच्या नादिया जिल्ह्यातील एका रुग्णालयात कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरांवर हल्ला केल्याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिसांनी मंगळवारी दिली. कथित हल्ल्याच्या निषेधार्थ आणि रुग्णालयात अधिक चांगल्या सुरक्षेच्या मागणीसाठी कनिष्ठ डॉक्टरांनी मंगळवारपासून कामबंद आंदोलनाची घोषणा केली आहे. ही घटना सोमवारी रात्री कल्याणी येथील जवाहरलाल नेहरू मेमोरियल रुग्णालयात घडली, असे त्यांनी सांगितले.

## निवृत्त सनदी तसेच सेना अधिकाऱ्यांची मागणी

# राहुल गांधींनी माफी मागावी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** संसद भवन परिसरात झालेल्या काँग्रेसच्या आंदोलनावरून निर्माण झालेला राजकीय वाद अधिकच तीव्र होत असून, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. देशातील २०४ निवृत्त लष्करी अधिकारी, माजी सनदी अधिकारी, राजनयिक आणि वकिलांनी गांधी यांनी आपल्या वर्तनाबद्दल राष्ट्राची माफी मागावी, अशी मागणी केली आहे.

मंगळवारी या माजी अधिकाऱ्यांनी एक खुले पत्र जारी करत १२ मार्च रोजी संसद परिसरात झालेल्या आंदोलनाचा उल्लेख केला. या पत्रात म्हटले आहे की, आंदोलनादरम्यान गांधी आणि इतर खासदारांचे वर्तन संसदीय शिष्टाचार व संस्थात्मक प्रतिष्ठेच्या विरोधात होते. विशेषतः, लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांच्या स्पष्ट निर्देशांनंतरही संसद परिसरात आंदोलन करण्यात आले, जे अध्यक्षांच्या आदेशाचे उल्लंघन असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

स्वाक्षरीकर्त्यांनी या कृतीला संसदीय परंपरेचा अवमान ठरवत, ती हेतुपुरस्सर केलेली असल्याचा आरोप केला आहे. त्यांच्या मते, संसदेसारख्या सर्वोच्च लोकशाही संस्थेच्या परिसरात अशा प्रकारचे आंदोलन करणे योग्य नसून, त्यामुळे संस्थेच्या प्रतिष्ठेला धक्का बसतो. पत्रात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, "संसद ही देशाची सर्वोच्च लोकशाही संस्था आहे आणि तिला राजकीय नाटकांचे व्यासपीठ बनवता कामा नये." आंदोलनादरम्यान खासदारांनी संसद भवनाच्या पायऱ्यांवर बसून चहा-बिस्किटे घेत निदर्शने केल्याचा उल्लेख करत, हे वर्तन लोकप्रतिनिधींना न शोभणारे असल्याची टीकाही करण्यात आली आहे.

या खुल्या पत्रात पुढे म्हटले आहे की, संसद भवनातील प्रत्येक भाग पायऱ्या, कॉरिडॉर आणि लॉबी यांना समान प्रतिष्ठा आहे. त्यामुळे या ठिकाणी लोकप्रतिनिधींचे वर्तनही त्याच निकषांवर तपासले गेले पाहिजे. वारंवार अशा घटना घडल्यास सार्वजनिक चर्चेचा स्तर खालावतो आणि लोकशाही संस्थांवरील विश्वास कमी होतो, असा इशाराही देण्यात आला आहे.

माजी अधिकाऱ्यांनी गांधी यांना माफी मागण्याबरोबरच आत्मपरीक्षण करण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून संसदेसारख्या घटनात्मक संस्थेची प्रतिष्ठा आणि विश्वासार्हता अबाधित राहील. "एक अब्जाहून अधिक नागरिकांच्या लोकशाही आकांक्षांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संस्थेचे सदस्य म्हणून खासदारांनी आपल्या कृतींचे प्रतीकात्मक महत्त्व लक्षात ठेवले पाहिजे," असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

हे पत्र जम्मू-काश्मीरचे माजी पोलीस महासंचालक एस. पी. वैद यांच्या समन्वयाने तयार करण्यात आले असून, त्यावर १०० हून अधिक माजी लष्करी अधिकारी, अनेक माजी नोकरशहा, राजनयिक आणि ज्येष्ठ वकिलांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

दरम्यान, संसदेत सुरू असलेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर हा वाद समोर आल्याने राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हे आहेत. तज्ज्ञांच्या मते, या प्रकरणामुळे संसदीय कार्यपद्धती, शिष्टाचार आणि लोकशाही परंपरांवर नव्याने चर्चा सुरू होण्याची शक्यता आहे.

## केरळमध्ये निवडणुकीपूर्वी प्रशासकीय फेरबदल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तिरुवनंतपुरम :** केरळ विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय यंत्रणा अधिक सज्ज करण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेत मंगळवारी आयएएस आणि आयपीएससह अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. ९ एप्रिल रोजी होणाऱ्या मतदानाच्या तयारीचा हा महत्त्वाचा भाग मानला जात असून, निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि निष्पक्ष ठेवण्याच्या उद्देशाने हे पाऊल उचलण्यात आले आहे.

या बदलांनुसार, टी. नारायणन यांची कोझिकोड येथील जिल्हा पोलीस प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर थॉमसन जोस हे त्रिशूर परिक्षेत्राचे उपमहानिरीक्षक (डीआयजी) म्हणून कार्यभार स्वीकारणार आहेत. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी या नियुक्त्यांना विशेष महत्त्व दिले जात आहे. प्रशासकीय पातळीवर, के. इनबासेखर यांची अलाप्पुझा जिल्हाधिकारी तसेच जिल्हा निवडणूक अधिकारी (डीईओ) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूक व्यवस्थापनाच्या दृष्टीने जिल्हाधिकारी पद अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. केरळ प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांमध्येही फेरबदल करण्यात आले आहेत. वंदना एस यांची थलिपरंबा येथे महसूल विभागीय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून त्या इरिक्कूर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक अधिकारी म्हणूनही काम पाहणार आहेत. तसेच सचिन कृष्णा यांची कन्नूर येथे जिल्हा महालेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली असून ते धर्मदम विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळतील.

आयोगाने मुख्य सचिवांना या बदलांबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत. सर्व नियुक्त्या तात्काळ प्रभावाने लागू करण्याचे आदेश देण्यात आले असून संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या नव्या पदांचा कार्यभार स्वीकारल्याचा अनुपालन अहवाल १८ मार्च रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## काबुल रुग्णालय हल्ला; भारताची तीव्र निंदा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अफगाणिस्तानची राजधानी काबुल येथील एका सरकारी रुग्णालयावर झालेल्या हवाई हल्ल्याच्या घटनेनंतर भारताने तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे. अफगाण अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'ओमिड' नावाच्या पुनर्वसन रुग्णालयावर झालेल्या या हल्ल्यात किमान ४०० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून सुमारे २५० जण जखमी झाले आहेत. या घटनेमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर संताप व्यक्त होत आहे.

तालिबान प्रशासनाच्या अहवालानुसार, हल्ल्यावेळी रुग्णालयात सुमारे दोन हजार रुग्ण उपचार घेत होते. हवाई हल्ल्यामुळे रुग्णालयाच्या इमारतीचा मोठा भाग उद्ध्वस्त झाला असून अनेक रुग्ण ढिगाऱ्याखाली अडकले. प्रत्यक्षदर्शींनी घटनास्थळी भीषण स्फोट, आग आणि जखमींच्या आक्रोशाचे वर्णन केले आहे.

भारताने या हल्ल्याला "कायरतापूर्ण" आणि "निर्दोष नागरिकांवर थेट हल्ला" असे संबोधत तीव्र निषेध व्यक्त केला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात नागरी सुविधांवर, विशेषतः रुग्णालयांसारख्या ठिकाणांवर हल्ला करणे हे आंतरराष्ट्रीय मानवीय कायद्याचे गंभीर उल्लंघन असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. अशा प्रकारच्या कृती कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नसल्याचेही भारताने ठामपणे नमूद केले.

पाकिस्तानकडून या हल्ल्याबाबत वेगळी भूमिका मांडण्यात आली आहे. त्यांनी हा हल्ला दहशतवादी ठिकाणांना लक्ष्य करून करण्यात आल्याचा दावा केला असून नागरी रुग्णालयावर हल्ला झाल्याचे आरोप फेटाळले आहेत. मात्र, अफगाण अधिकाऱ्यांनी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी रुग्णालय पूर्णपणे नागरी वापरासाठी असल्याचे स्पष्ट करत पाकिस्तानच्या दाव्याला विरोध केला आहे.

या घटनेनंतर आंतरराष्ट्रीय समुदायाकडूनही तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

## गुजरातमध्ये समान नागरी संहिता लागू होणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अहमदाबाद :** गुजरातमध्ये समान नागरी संहिता (यूसीसी) लागू करण्याच्या दिशेने महत्त्वाची प्रगती झाली असून, न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीने आपला अंतिम अहवाल मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांना सादर केला आहे.

या घडामोडीमुळे राज्यात एकसमान वैयक्तिक कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी प्रक्रिया अधिक वेगाने पुढे सरकणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

गांधीनगर येथे मुख्यमंत्री पटेल यांना तीन खंडांमध्ये सादर करण्यात आलेल्या या अहवालात विवाह, घटस्फोट, वारसा हक्क आणि दत्तकविधान यांसारख्या नागरी जीवनातील महत्त्वाच्या बाबींवर एकसमान कायदेशीर चौकट प्रस्तावित करण्यात आली आहे. विविध धर्म आणि समुदायांमधील वैयक्तिक कायद्यांमध्ये सुसंवाद साधत घटनात्मक समानतेच्या तत्त्वांवर आधारित व्यवस्था निर्माण करण्याचा या मसुद्याचा उद्देश आहे.

अहवालात विशेषतः महिलांच्या हक्कांचे संरक्षण, लिंगसमता आणि कायद्यापुढील समानता यांवर भर देण्यात आला आहे. त्याचवेळी गुजरातच्या सामाजिक व सांस्कृतिक विविधतेचा आदर राखत संतुलित कायदेव्यवस्था उभारण्याचा प्रयत्न दिसून येतो. समितीने जिल्हास्तरीय सल्लामसलत, विविध हितधारकांशी संवाद आणि तुलनात्मक कायदेशीर अभ्यास यांच्या आधारे हा अहवाल तयार केला आहे.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, प्रस्तावित बदल समाजातील संतुलन बिघडवणार नाहीत, याची काळजी घेत बहुस्तरीय प्रक्रिया राबवण्यात आली. त्यामुळे कायदेशीर सुसंगतता आणि सामाजिक वास्तव यामध्ये समतोल राखण्याचा प्रयत्न या अहवालात दिसून येतो.

मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी या अहवालाचे स्वागत करत, "समितीने व्यापक अभ्यास आणि जनचर्चेनंतर सविस्तर अहवाल सादर केला आहे. सर्व समुदायांसाठी समान कायदेशीर चौकट तयार करताना महिलांच्या संरक्षणावर विशेष भर देण्यात आला असून राज्याच्या विविधतेचाही आदर राखण्यात आला आहे," असे स्पष्ट केले.

समितीच्या रचनेमुळे अहवालाला अधिक बळ मिळाले आहे. यात निवृत्त सनदी अधिकारी सी. एल. मीना, ज्येष्ठ वकील आर. सी. कोडेकर, शिक्षणतज्ञ डॉ. दक्षेश ठाकर, सामाजिक कार्यकर्त्या गीता श्रॉफ यांचा समावेश असून, उत्तराखंडचे माजी मुख्य सचिव शत्रुघ्न सिंह यांचेही सल्लागार सहकार्य लाभले आहे.

## इराण-इस्रायल संघर्ष तीव्र; लारीजानी लक्ष्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली/तेहरान :** इराण-इस्रायल संघर्षाचा आज (मंगळवार, १७ मार्च) १८वा दिवस असून तणाव अधिक तीव्र होत चालला आहे. या पार्श्वभूमीवर इस्रायली संरक्षण दल (आयडीएफ) ने मोठा दावा करत इराणमधील अलीकडील हवाई हल्ल्यात वरिष्ठ नेत्यांना लक्ष्य केल्याचे सांगितले आहे. आयडीएफच्या माहितीनुसार, इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे प्रमुख अली लारीजानी यांना लक्ष्य करण्यात आले होते. मात्र, या हल्ल्यात ते ठार झाले की जखमी झाले, याबाबत अद्याप अधिकृत पुष्टी झालेली नाही.

आयडीएफने असा दावा केला आहे की, इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सशी संबंधित बसिज दलाचे सर्वोच्च कमांडर गुलामरेझा सोलेमानी हे या हल्ल्यात ठार झाले आहेत. इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल कारेत्झ यांनी लारीजानी यांच्या मृत्यूचाही दावा केला आहे. या विधानामुळे इराणमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. सोलेमानी यांचा मृत्यू हा इराणच्या "आदेश आणि नियंत्रण रचनेला" मोठा धक्का मानला जात आहे. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या नेतृत्वाखालील सत्ताकेंद्रात लारीजानी यांना अत्यंत प्रभावशाली व्यक्ती मानले जात होते. त्यांनी यापूर्वी अणुविषयक वाटाघाटींमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली होती. लारीजानी यांना शेवटचे १३ मार्च रोजी पाहण्यात आले होते.

इस्रायली हवाई कारवाईदरम्यान तेहरान, शिराझ आणि तब्रीझ या महत्त्वाच्या शहरांमध्ये एकाच वेळी हल्ले करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या हल्ल्यांमध्ये तेहरानमधील कमांड सेंटर, क्षेपणास्त्र प्रक्षेपण स्थळे आणि हवाई संरक्षण प्रणाली लक्ष्य करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

## भवानीपूरमध्ये हाय-व्होल्टेज लढत रंगणार

# बंगालमध्ये 'दीदी' विरुद्ध अधिकारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या राजकारणात पुन्हा एकदा हाय-व्होल्टेज सामना रंगण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांच्यात थेट लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. भाजपने सोमवारी जाहीर केलेल्या १४४ उमेदवारांच्या यादीत सुवेंदू अधिकारी यांना नंदिग्राम मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, त्यांनी मागील निवडणुकीत याच मतदारसंघातून ममता बॅनर्जी यांचा पराभव केला होता.

याशिवाय सुवेंदू अधिकारी भवानीपूर मतदारसंघातूनही निवडणूक लढवत आहेत. सध्या हा मतदारसंघ ममता बॅनर्जी यांच्या ताब्यात आहे. ममता बॅनर्जी यांनीही भवानीपूरमधूनच निवडणूक लढवण्याची घोषणा केल्याने या ठिकाणी थेट आमनेसामने लढत होणार आहे. त्यामुळे नंदिग्राममधील राजकीय संघर्षाची पुनरावृत्ती भवानीपूरमध्ये पाहायला मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

नंदिग्राममधील पराभवानंतर ममता बॅनर्जी आणि सुवेंदू अधिकारी यांच्यातील राजकीय वैर अधिक तीव्र झाले होते. त्यामुळे यंदाची ही लढत प्रतिष्ठेची मानली जात आहे. भवानीपूरमध्ये दोन्ही नेत्यांमध्ये थेट सामना होणार असल्याने राज्यातील राजकारण तापण्याची चिन्हे आहेत.

दरम्यान, ममता बॅनर्जी यांनी आगामी निवडणुकांबाबत आत्मविश्वास व्यक्त करत राज्यात २२६ जागा जिंकून सलग चौथ्यांदा सत्ता मिळवू, असा दावा केला आहे. त्यांनी निवडणूक प्रक्रियेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत निवडणूक आयोगावर जोरदार टीका केली. ईदपूर्वी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या जात असल्याचा आरोप त्यांनी केला असून, त्यामुळे राज्यात तणाव निर्माण होऊ शकतो, असेही त्यांनी म्हटले. ममता बॅनर्जी यांनी आरोप केला की, निवडणूक आयोग हा भाजपच्या दबावाखाली काम करत आहे. "राज्यात कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्यासाठी निवडणूक आयोग आणि भाजप जबाबदार असतील," असा इशाराही त्यांनी दिला. आयोगाने निष्पक्षपणे काम करावे, अन्यथा थेट भाजपसाठी प्रचार करावा, असा टोला त्यांनी लगावला.

२०२१ च्या विधानसभा निवडणुकीत भाजप आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात चुरशीची लढत झाली होती. त्या निवडणुकीत भाजपने ७७ जागा जिंकत मोठी झेप घेतली होती. २०१६ मध्ये केवळ तीन जागांवर असलेल्या पक्षाने पाच वर्षांत मोठी वाढ साधली होती. यंदाही भाजप कडवी झुंज देण्याच्या तयारीत असून, उमेदवारांची मोठी यादी जाहीर करून त्यांनी निवडणुकीची रणधुमाळी सुरू केल्याचे स्पष्ट झाले आहे.

## लडाखमध्ये राज्याच्या दर्जासाठी मोठे आंदोलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर :** लडाखला राज्याचा दर्जा आणि केंद्रशासित प्रदेशासाठी सहावी अनुसूची लागू करण्याच्या मागण्यांसाठी लेह आणि कारगिल जिल्ह्यांत सोमवारी मोठ्या प्रमाणावर शांततापूर्ण निदर्शने पार पडली. लेह सर्वोच्च समिती (एलएबी) आणि कारगिल लोकशाही आघाडी (केडीए) यांच्या संयुक्त आवाहनाला प्रतिसाद देत कारगिलमध्ये बंद पाळण्यात आला, तर लेहमध्ये मोठा मोर्चा काढण्यात आला.

लेहमध्ये शेकडो स्थानिक नागरिकांनी पारंपरिक पोशाख परिधान करून सिंगे नामग्याल चौकापासून लेह पोलो ग्राउंडपर्यंत मोर्चा काढला. निदर्शकांच्या हातात विविध मागण्यांचे फलक होते. "आम्हाला सहावी अनुसूची हवी आहे", "आम्हाला राज्याचा दर्जा हवा आहे" आणि "केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा अस्वीकार्य आहे" अशा घोषणांनी परिसर दुमदुमला. या रॅलीत सुमारे सात ते आठ हजार लोक सहभागी झाल्याची माहिती स्थानिक नेतृत्वाकडून देण्यात आली.

२४ सप्टेंबर रोजी लेहमध्ये झालेल्या आंदोलनादरम्यान हिंसाचार उसळून पोलिसांच्या गोळीबारात चार जणांचा मृत्यू झाला होता, तर सुमारे ८० जण जखमी झाले होते. त्या घटनेनंतरचे हे पहिले मोठे शक्तीप्रदर्शन मानले जात आहे. आंदोलनकर्त्यांनी त्या हिंसाचाराच्या न्यायिक चौकशीचा अहवाल लवकर जाहीर करावा, अशी मागणीही केली.

ग्लेनफुंचोक यांनी सांगितले की, आंदोलनादरम्यान लोकांनी चार प्रमुख मागण्यांबाबत आपली भूमिका ठामपणे मांडली. पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या सुटकेचे स्वागत करत इतर ताब्यातील कार्यकर्त्यांचीही मुक्तता करण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी माजी आमदार डेल्डन नामग्याल आणि माजी नगरसेवक समला दोर्जे यांच्या सुटकेसाठीही आवाज उठवला.

चेरिंग दोर्जे यांनी केंद्र सरकारने स्थानिक जनतेच्या भावना ओळखून चर्चेची प्रक्रिया पुन्हा सुरू करावी, असे आवाहन केले. "लडाखमधील नागरिकांना घटनात्मक संरक्षण मिळावे आणि त्यांच्या सांस्कृतिक व भौगोलिक वैशिष्ट्यांचे जतन व्हावे, यासाठी सहावी अनुसूची अत्यावश्यक आहे," असे त्यांनी नमूद केले.

## माता वैष्णो देवीच्या सुरक्षेचा आढावा

**जम्मू :** १९ मार्चपासून सुरू होणाऱ्या नवरात्री उत्सवाच्या पार्श्वभूमीवर, उधमपूर-रियासी परिक्षेत्राच्या पोलीस उपमहानिरीक्षक सारा रिझवी यांनी मंगळवारी माता वैष्णो देवीच्या गुहा मंदिरात आणि तीर्थयात्रेच्या मार्गावरील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. वैष्णो देवी यात्रेचे मुख्य केंद्र असलेल्या कटरा येथे संयुक्त सुरक्षा आढावा बैठकीत या उत्सवाचे सुरळीत आणि शांततेत आयोजन सुनिश्चित करण्यासाठी केलेल्या योजनांचा आढावा घेतला.

## हरियाणा राज्यसभा निवडणुकीत वाद; मतमोजणीला विलंब

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चंदीगड :** हरियाणातील दोन राज्यसभा जागांसाठी झालेल्या निवडणुकीत "मत गोपनीयतेचा भंग" झाल्याच्या आरोपांमुळे राजकीय वातावरण तापले असून, मतमोजणी प्रक्रियेलाही विलंब झाला आहे. भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांनी भारतीय निवडणूक आयोगाकडे तक्रारी दाखल केल्याने निकाल जाहीर होण्यास अडथळा निर्माण झाला आहे.

या निवडणुकीत एकूण ८८ आमदारांनी मतदान केले. मात्र इंडियन नॅशनल लोक दल पक्षाच्या दोन आमदारांनी मतदानापासून दूर राहण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे राजकीय समीकरणांमध्ये अधिकच अनिश्चितता निर्माण झाली आहे. राज्याचे कॅबिनेट मंत्री कृष्ण कुमार बेदी यांनी सांगितले की, काँग्रेसच्या दोन आमदारांच्या मतदानावेळी मत गोपनीयतेचा भंग झाल्याचा आरोप करत भाजपने निवडणूक आयोगाकडे औपचारिक तक्रार नोंदवली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणीही भाजपने केली आहे.

दुसरीकडे, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी या निवडणुकीत हस्तक्षेप होत असल्याचा आरोप करत आयोगाला पत्र लिहिले आहे. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित करत त्यांनी आयोगाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी केली आहे.

## विरोधकांना मोठा धक्का; सत्ताधाऱ्यांची बाजी

# राज्यसभा निवडणुकीत एनडीएला निर्णायक आघाडी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** राज्यसभेच्या निवडणुकीत विरोधी पक्षांच्या आमदारांकडून झालेल्या क्रॉस-व्होटिंग, तिहेरी मतदान आणि गैरहजेरीच्या घटनांमुळे सत्ताधारी एनडीएला मोठा फायदा झाला असून विरोधी आघाडीला मोठा धक्का बसला आहे. या घडामोडींमुळे अनेक अटीतटीच्या लढतींमध्ये सत्ताधाऱ्यांनी बाजी मारली.

१० राज्यांतील ३७ जागांसाठी ही निवडणूक झाली. त्यापैकी २६ उमेदवार आधीच बिनविरोध निवडून आले होते, तर उर्वरित ११ जागांसाठी सोमवारी मतदान झाले. बिहारमध्ये पाच, ओडिशामध्ये चार आणि हरियाणात दोन जागांसाठी मतदान पार पडले.

या निवडणुकीत एनडीएने आठ जागांवर विजय मिळवला. बिहारमधील सर्व पाच जागा एनडीएच्या झोळीत गेल्या, तर ओडिशामध्ये तीन जागा त्यांनी जिंकल्या. ओडिशामध्ये बीजेडीनेही एक जागा पटकावली. विशेष म्हणजे, ज्या जागांवर विरोधकांचे पारडे जड मानले जात होते, त्या ठिकाणीही क्रॉस-व्होटिंगमुळे निकाल सत्ताधाऱ्यांच्या बाजूने लागले.

हरियाणातील दोन जागांच्या निकालांवर मात्र अद्याप स्थगिती देण्यात आली आहे. मतदान प्रक्रियेत नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप करत काँग्रेस आणि भाजप या दोन्ही पक्षांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. त्यामुळे या दोन्ही जागांचा निकाल प्रलंबित ठेवण्यात आला आहे.

बिहारमध्ये एनडीएने सर्व पाच जागा जिंकत महाआघाडीला मोठा धक्का दिला. मुख्यमंत्री नितीश कुमार आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष नितीन नवीन हे विजयी उमेदवारांमध्ये होते. विरोधकांना आवश्यक असलेला ४१ आमदारांचा पाठिंबा मिळवता आला नाही. मतदानाच्या वेळी काँग्रेसचे तीन आणि आरजेडीचा एक आमदार गैरहजर राहिल्याने विरोधी उमेदवार अमरेंद्र धारी सिंह यांचा पराभव झाला.

ओडिशामध्येही एक अतिरिक्त जागेसाठी चुरशीची लढत झाली. येथे भाजपचे मनमोहन सामल आणि सुजीत कुमार, बीजेडीचे संस्कृत मिश्रा तसेच भाजप-समर्थित अपक्ष दिलीप राय विजयी झाले. या ठिकाणी बीजेडी आणि काँग्रेसच्या काही आमदारांनी क्रॉस-व्होटिंग केल्याचे समोर आले, ज्याचा थेट फायदा एनडीएला झाला.

दरम्यान, लोकसभेतील घडामोडींमध्येही महत्त्वाची शक्यता व्यक्त होत आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांनी बोलावलेल्या बैठकीनंतर आठ विरोधी खासदारांचे निलंबन मागे घेतले जाऊ शकते, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. गैरवर्तनाच्या आरोपावरून काँग्रेसचे सात आणि सीपीआय(एम)चा एक खासदार संपूर्ण अधिवेशनासाठी निलंबित करण्यात आला होता. हे अधिवेशन २ एप्रिल रोजी संपणार आहे. एकूणच, राज्यसभा निवडणुकीतील या निकालांमुळे सत्ताधारी आघाडीची ताकद वाढल्याचे दिसून येत असून, विरोधी पक्षांसाठी ही निवडणूक मोठा राजकीय धक्का मानली जात आहे.